इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

## कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर, जि. पुणे

### विद्‍यार्थी सूचना

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की आपल्या महाविद्यालया मध्ये **स्वमी विवेकानंदयुवा सूरक्षा योजना** सुरू आहे. तरी ज्या विद्यार्थ्यांना या योजने चा लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी svyuvasuraksha.org या संकेतस्थळा वर या योजेने बाबत माहिती घ्यावी .

प्राचार्य
PRINCIPAL
Arts, Science & Commerce
डॉ. जीवन सरवदे

विद्यार्थी विकास

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

स्वररंग

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२४–२५/७८१ — **अत्यंत महत्त्वाचे व कालमर्यादेचे** — दिनांक : १८/१०/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

विषय : स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना सहभागी विद्यार्थी माहिती पाठविणेबाबत....

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासननिर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४/वि शि ५, दि. १६ ऑक्टोबर, २०२३
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासननिर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४/वि शि ५, दि. २८ नोव्हेंबर, २०२३
३. उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांचे उशिसं/विवि/२०२३/मवि–१/१६२४३, दि. ०६ डिसेंबर, २०२३
४. या विभागाचे विविमं/२०२३–२४/४००, दि. २९/१२/२०२३ चे पत्र.
५. या विभागाचे विविमं/२०२३–२४/३३४, दि. २९/०४/२०२४ चे पत्र.
६. या विभागाचे विविमं/२०२४–२५/४६१, दि. २३/०७/२०२४ चे पत्र.
७. मा. उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे उशिसं/विवि/२०२४/मवि–०१/E-Comp. No. ८७९८४८ दि. १७ ऑक्टोबर, २०२४ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थ्यांसाठी "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा (Personal Accident Insurance) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) योजना लागू करण्यात आली आहे. सदर 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना' आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील विविध माध्यमातून व्यापक प्रमाणात प्रसिद्धी देऊन सर्व विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करून नोंदणी करण्याबाबत आपणास यापूर्वीच कळविण्यात आले आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ७ अन्वये शासनाने सदर योजनेच्या अनुषंगाने;

१. संलग्नित महाविद्यालयांतील किती विद्यार्थ्यांनी विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा व विद्यार्थी वैद्यकीय विमा साठी नोंदणी केलेली आहे. याबाबतचा तपशिल मागविला आहे.

२. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर तपशिल उपलब्ध करून दिला आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करावा संकेतस्थळावर तपशिल उपलब्ध नसल्यास, तात्काळ सदरहू योजनेचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत.

शासन निर्देशानुसार आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागातील किती विद्यार्थ्यांनी विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा व विद्यार्थी वैद्यकीय विमा साठी नोंदणी केलेली आहे व योजनेचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध आहे किंवा नाही याची माहिती खालील गुगल लिंकवर दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरण्यात यावी.

https://forms.gle/Mv9M5ZgGvkH39qKZA

सदर माहिती महाराष्ट्र शासनाकडे निर्गमित करावयाची असल्याने खात्रीपूर्वक व जबाबदारीने दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरण्याबाबत संबंधितास सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार) विद्यार्थी विकास मंडळ